## नियमित दिवाणी दावा क्र.५४८/२०१७ मधील नि.क्र.०६ वरील आदेश

**०१.** वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.१ ने दि.०९.११.२०१६ रोजी केलेला आदेश चुकीचा व बेकायदेशीर आहे असे जाहिर होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. तसेच सदर आदेशाची प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अंमलबजावणी करु नये या निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे असे म्हणणे आहे की, गट क्र.६७७/१ मौजे सुरुल, ता. वाळवा, जि. सांगली येथील १हे.११ आर. ही त्याच्या मालकी व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतमध्ये वादी याने सन १९९८ साली जिल्हा परिषदेच्या जवाहर योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेकडुन अनुदान घेवुन विहीर काढली आहे. सदर विहीर ही वादी याच्या एकटयाच्या मालकीची आहे. सदर विहीरीवर प्रतिवादी क्र.४ ते ६ जे की, वादीचे सख्खे भाऊ आहेत यांचा कोणताही अधिकार नाही. परंतु प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी वादी सोबत असलेल्या वादामुळे तसेच त्यांच्यात प्रलंबित असलेल्या दिवाणी व फौजदारी प्रकरणांचा राग मनात असल्यामुळे, त्यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याकडे वादीविरुध्द खोटया तक्रारी दाखल केल्या की, वादीने गट क्र.६७७/१ मध्ये सन १९९७–१९९८ पुर्वीच विहीर असताना जुनीच विहीर दाखवुन जवाहर योजनेअंतर्गत शासनाचा मिळालेला अनुदान लाटला. सदर तक्रारीवरुन प्रतिवादी क्र.१ ने दि.०९.११.२०१६ रोजी आदेश पारीत केला व वादीने बांधलेली विहीर अपात्र

ठरविली. सदर आदेशानुसार प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या कार्यालयाकडुन वादीला त्याला जवाहर योजनेअंतर्गत मिळालेली र.रु.४५,०००/– पुन्हा शासनास जमा करणेबाबत नोटीसा देण्यात आल्या. वादीला दि.१६.११.२०१६ व दि.१८.०३.२०१७ रोजी सदर नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ ने दि.०९.११.२०१६ रोजी जो आदेश पारीत केलेला आहे तो चुकीचा व बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदर आदेशाआधारे वादीला जारी करण्यात आलेल्या नोटीसा देखील बेकायेदशीर आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे त्यांनी केलेल्या बेकायदेशीर कारवाईच्या आधारे वादीकडुन रु.४५,०००/– वसुल करुन घेण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे वादीने त्यांना थांबविण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना कोणतीही कारवाई करण्यापासुन रोखण्यासाठी प्रस्तुतचा तात्पुरता मनाई हुकूमचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.४० वर दाखल केलेले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांच्या कार्यालयाकडे वादीने सन १९९३ साली गट नं.९७७ मध्ये विद्युत पुरवठयाची मागणी केली होती. त्या मागणीमध्ये सदर गटात विहीर असल्याबाबत तलाठयाने दि.०८.०७.१९९३ रोजी अहवाल दिला होता. अशा बाबतच्या तक्रारी वादीविरुध्द प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदर तक्रारीवर चौकशी करुन प्रतिवादी क्र.१– अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, यांनी दि.१९.०५.२०१७ रोजी वादीविरुध्द फौजदारी कारवाईचा आदेश जारी केला आहे. सदर आदेशानुसार प्रतिवादी क्र.२ व ३ हे वादीला अनुदानाची रक्कम शासनाला परत करण्याबाबत नोटीस पाठवित आहेत. प्रतिवादी क्रे.१ ते ३ यांनी केलेली कारवाई ही

कायदेशीर असल्यामुळे वादीला सदर कारवाईबाबत प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी वादीचा दावा खारीज करण्याची विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादी क्र.१ ला दाव्याचे समन्स मिळुन देखील ते दाव्यात हजर झाले नाहीत. त्यामुळे दावा त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालवण्यात आला.

**०५.** वादीचा अर्ज, प्रतिवादी क्र.२ व ३ चे म्हणणे पाहिले असता, खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयांसमोर मी माझे निष्कर्ष नोंदवून त्याखाली कारणमीमांसा केली आहेः-

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वादी त्याच्या लाभात तात्पुरता मनाई हुकूम देण्यासाठी प्रथमदर्शनी बाब शाबीत करतो का ? | ...नकारार्थी. |
| **२.** | वादीच्या लाभ्यात तात्पुरता मनाई हुकूम देणे सोयीचे आहे काय ? | ...नकारार्थी. |
| **३.** | मनाई हुकूम न दिल्यास, वादीचे न भरुन येणारे नुकसान होईल काय ? | ...नकारार्थी. |
| **४.** | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमीमांसा</u>

### <u>मुद्दे क्र.०१ ते ०३ साठीः</u>

**०६.** मुद्दे क्र.०१ ते ०३ हे एकमेकांशी सुसंगत असल्यामुळे त्यांची कारणमिमांसा एकत्रीतपणे केलेली आहे. वादीच्या वकीलांचे असे म्हणणे आहे की,

वादीने शासनाची पुर्व परवानगी घेवुन त्याच्या मालकीचा गट नं.६७७/१ मध्ये जवाहर योजनेअतर्गत सन १९९७–११९८ साली विहीर बांधली आहे. सदर विहीर ही प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या कार्यालयातील अधिका–याच्या देखरेखीखाली बांधण्यात आलेली आहे. सदर विहीरीवर वादीने सुमारे रु.६००,०००/– खर्च केलेले आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीविरुध्द बेकायदेशीर कारवाई केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ने दि.०९११.२०१६ रोजी पारीत केलेला आदेश हा बेकायदेशीर आहे. त्यामुळे आदेशाची अंमलबजावणी करता येणार नाही. वादीने दाव्यासोबत त्याने विहिर बांधकाम परवानगीसाठी दिलेला अर्ज व इतर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच वादीने गट क्र.६७७/१ चा जुना व नवीन ७/१२ चा उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उता–यावरुन हे सिध्द होते की, वादीने जवाहर योजनेअंतर्गत विहीर बांधण्यापुर्वी त्याच्या शेतात कोणतीही विहीर नव्हती. सदर कागदपत्रांवरुन हे सिध्द होत आहे की, प्रतिवादी क्र.१ ने दिलेला आदेश हा चुकीचा व बेकायदेशीर आहे. वादीने त्याचे कथन प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. त्यामुळे वादी तात्पुरता मनाई हुकूम मिळणेस हक्कदार आहे.

**०७.** या उलट, प्रतिवादी क्र.२ व ३ च्या वकीलांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादी प्रथमदर्शनी त्याचे म्हणणे सिध्द करण्यास अपयशी राहिलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ने संपुर्ण चौकशी करुन वादीविरुध्द योग्य तो आदेश पारीत केलेला आहे. सदर आदेशावरुन प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वादीला वेळोवेळी अनुदानाची रक्कम पुन्हा शासन जमा करणेबाबत पुन्हा नोटीसा पाठवल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ ने पारीत केलेला आदेश हा कायदेशीर असल्यामुळे वादीला प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा हक्क नाही. त्यामुळे वादी तात्पुरता मनाई हुकूम मिळणेचा हक्कदार नाही.

**०८.** वादीचे असे म्हणणे आहे की, दि. ०९.११.२०१६ रोजी प्रतिवादी क्र.१ ने जो आदेश पारीत केला आहे तो बेकायदेशीर आहे. मी सदर आदेशाची प्रत पाहिली. प्रतिवादी क्र.१ अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, यांनी दि.०९.११.२०१६ रोजी आदेश क्र.पीबी४/२२५६/१६ हा पाहिला. सदर आदेश हा प्रतिवादी क्र.१ यांनी दि.०४.११.२०१६ रोजीच्या मंजुर टिपण्णीनुसार पारीत केलेला आहे. सदर आदेशात वादी हा जवाहर योजनेअंतर्गत अनुदान मिळणेस अपात्र आहे, असे नमुद करण्यात आलेले आहे. सदर आदेश हा कशाप्रकारे बेकायदेशीर आहे याबाबत वादीने कोणताही खुलासा केलेला नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी सदर आदेश हा बेकायदेशीर असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही.

**०९.** याव्यतीरीक्त दि.०९.११.२०१६ रोजीचा आदेश हा प्रतिवादी क्र.१ अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, यांनी जिल्हा परिषद कायदा व महाराष्ट्र ग्रामपंचायत कायद्यामधील तरतुदीनुसार पारीत केल्याचे दिसुन येते. सदर आदेशाविरुध्द वादीने योग्य त्या न्यायालयासमोर दाद मागणे आवश्यक होते. दिवाणी न्यायालयात सदर आदेशाविरुध्द वादीने जिल्हा परिषद कायदा व महाराष्ट्र ग्रामपंचायत कायद्यामधील कोणत्या तरतुदीनुसार दावा दाखल केला आहे हे सांगण्यास वादी अपयशी ठरला आहे.

**१०.** प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ ने पारीत केलेल्या कायदेशीर आदेशाची अंमलबजावणी करीत आहेत. एखाद्या कायदेशीर आदेशाची अंमलबजावणी करण्यापासुन थांबविण्यासाठी तात्पुरता मनाई हुकूम देण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. त्यामुळे वादी तात्पुरता मनाई हुकूम मिळणेस हक्क्दार नाही. मी

वरील सर्व गोष्टींवरुन मुद्दा क्र.०१ ते ०३ चे उत्तर नकारार्थी देऊन खालील आदेश पारीत करीत आहेः–

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by Kamaljeet Mangilal Chandaliya
Date: 2023.07.10 17:15:09 +0530

**इस्लामपुर.**
**दिनांक ०७.०७.२०२३.**

**(कमलजीत एम.चंडालिया)**
**पाचवे सह दिवाणी न्यायाधीश,**
**कनिष्ठ स्तर, इस्लामपुर.**